


दैनिक
नवीन
संध्या
https://www.dailynavinsandhya.com
RNI No.MAHMAR/2010/36460
DEC. No. SDM/SR/PUNE/87/2019




वर्ष १६ ❁ अंक ३३ दैनिक ❁ पुणे, बुधवार ७ जानेवारी २०२६ ❁ किंमत ३ रुपये ❁ पाने : ६

# मुंबई, भ्रष्टाचार, बिनविरोधपासून सातारा ड्रग्ज प्रकरणापर्यंत...; महेश मांजरेकरांच्या २ विधानांनी वेधलं लक्ष!



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी ठाकरे बंधूंची मुलाखत घेतली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची ही मुलाखत ८ आणि ९ जानेवारीला प्रकाशित होणार आहे. त्याआधी ठाकरे बंधूंच्या या मुलाखतीचा पहिला टीझर संजय राऊत यांनी शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये राज्यकर्त्यांचे प्रेम हे राज्यावर असले पाहिजे, सत्तेवर असता कामा नये, असं उद्धव ठाकरे बोलताना दिसत आहे. तर मुंबईतील समस्या समजण्यासाठी मुंबईत जन्माला आल्याशिवाय कळणार नाही, असं राज ठाकरे म्हणाले.

संजय राऊतांनी शेअर केलेल्या ठाकरे बंधूंच्या स्फोटक मुलाखतीच्या टीझरमध्ये ठाकरे बंधूंना एकत्र येण्यासाठी महाराष्ट्राला २० वर्षे वाट का पाहावी लागली, असं संजय राऊत प्रश्न विचारताना दिसत आहे. तर मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्यासाठी या सगळ्यांचे खटाटोप सुरु आहेत, असा दावा राज ठाकरे करताना दिसत आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी भ्रष्टाचाराच्या गोष्टी करुच नये, असा इशाराही राज ठाकरेंनी दिला आहे.

सातार्‍यात उपमुख्यमंत्र्यांच्या घराबाहेर ड्रग्ज सापडल्याचे सांगितले. तसेच दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी देखील मुलाखतीमध्ये लक्ष वेधले. मुंबईतील वाहतूक समस्या आणि इतर प्रश्न महेश मांजरेकरांनी उपस्थित केले. मी खरं सांगतो, मुंबईकर म्हणून मला आता घराबाहेर पडताना लाज वाटते, असं महेश मांजरेकर म्हणाले. तसेच १० मिनिटांच्या अंतरासाठी आता १ तास लागत असल्याचं देखील महेश मांजरेकरांनी सांगितले.

यावर मुंबई खराब व्हायला एक काळ लोटला, मात्र पुण्यात असं होणार नाही. पुणे लवकरात लवकर बरबाद होईल, असा सावध इशारा राज ठाकरेंनी दिला. तसेच ज्या ठिकाणी बिनविरोध उमेदवार निवडून आले, त्याठिकाणी लोकं बोटावर शाई कशी दाखवणार, असा सवाल महेश मांजरेकर उपस्थित करतात. यावर वाटलेल्या नोटांमुळे हे सर्व घडलं, अशी टीका ठाकरे बंधू करताना टीझरमध्ये दिसून येत आहे.

ठाकरे बंधूची एक्सपायरी डेट जवळ आली– निलेश राणे

ठाकरे ब्रँड फक्त बाळासाहेब ठाकरेचं, बाकी हे कोणी नाही. हे संपलेत, कार्यकर्ता यांच्या मागे नाही, उमेदवार मिळत नाही. संतापलेले पदाधिकारी यांना शिव्या घालून शाखा बंद करत आहेत. बोलायला लागलो तर कपडे राहणार नाहीत. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात यांनी पालिकेत कसे कसे किती आणि कुठे कुठे पैसे खाल्ले आहेत ना सर्व काढणार, असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांनी दिला.

संजय राऊत कधी लोकांमधून निवडून आलेत का? ते ज्या पद्धतीने एकनाथ शिंदेवर बोलतात यांनी केलेलं एक सामजिक काम दाखवावं आणि मग श्रेयासाठी पुढे यावं. या ठाकरे बंधूची एक्सपायरी डेट जवळ आलेली आहे. ते या पालिका निवडणुकीत पहायला मिळेल. ज्या मराठी माणसाला यांनी देशोधडीला लावलं, मुंबईतून हद्दपार केलं तो मराठी माणून कधीच यांच्या मागे उभा राहणार नाही, असंही निलेश राणे म्हणाले.

## उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार दिल्लीत अनधिकृत मशिदीवर मनपाची कारवाई, दगडफेक करणाऱ्यांना पोलिसांचा दणका



**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार एमसीडी अर्थात दिल्ली मनपाने तुर्कमान गेट परिसरातील अनधिकृत मशिद आणि इतर बेकायदा बांधकाम पाडले. मोठ्या पोलीस बंदोबस्तात मनपाने कारवाई केली. कारवाई सुरू असताना मुसलमानांनी दगडफेक करुन शासकीय कामात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी बळाचा वापर करुन परिस्थितीवर लगेच नियंत्रण मिळवले.

अनधिकृत बांधकाम पाडण्यासाठी दिल्ली मनपाने दहा बुलडोझर, १५ जेसीबी, ७० डंपर यांचा वापर केला. मनपाच्या कारवाईवेळी वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच एक हजार पोलीस जवानांचा बंदोबस्त घटनास्थळी होता. मशिदीकडे जाणारे सर्व रस्ते बॅरिकेटिंग लावून बंद करण्यात आले होते.

**दगडफेक आणि पोलिसांचा लाठीमार**

कारवाई सुरू असतानाच स्थानिक लोक आणि बाहेरून आलेल्या नागरिकांनी विरोध करत जमावाने बॅरिकेडिंग तोडण्याचा प्रयत्न केला आणि पोलिसांवर दगडफेक केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या आणि गॅस बुलेट्सचा वापर केला. पोलिसांनी ड्रोन कॅमेऱ्यांच्या साहाय्याने संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवले होते.अधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई केली आहे. ज्यांनी दगडफेक आणि हिंसाचार केला, त्यांची ओळख सीसीटीव्ही फूटेजच्या आधारे केली जाईल. कोणत्याही उपद्रवी व्यक्तीला सोडले जाणार नाही.

**न्यायालयाचा आदेश काय होता ?**

डिसेंबर महिन्यात एमसीडीने रामलीला मैदानातील अवैध अतिक्रमण आणि अनधिकृत व्यावसायिक उद्योग थांबवण्याचे आदेश दिले होते. तपासात असे आढळले की, सरकारी जमिनीचा वापर नकाशात नसलेल्या मोठ्या बांधकामासाठी आणि लग्नाचा हॉल याचा वापर खासगी कार्यक्रमांसाठी केला जात होता. दिल्ली उच्च न्यायालयाने मशिदीला लागून असलेला दवाखाना बेकायदा घोषित केला होता.

## पुण्यातील निवडणुकीत नामचीन भाईंना उमेदवारी, पोलिसांची करडी नजर

**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात जवळजवळ सर्वच राजकीय पक्षांकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे शहरातील युवा पिढीला गुन्हेगारीकडे जाण्यापासून कसे रोखायचे हे एक मोठे सामाजिक आणि प्रशासकीय आव्हान ठरत आहे. पुणे शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढताना दिसत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार प्रचारादरम्यान नेमके काय करत आहेत, यावर पुणे पोलिसांची करडी नजर आहे. प्रचारात पैशांचा गैरवापर, अवैध व्यवहार किंवा दहशत निर्माण होत आहे का, याची बारकाईने तपासणी केली जात आहे.

शहरात कोणतीही बेकायदेशीर किंवा चुकीची घटना घडल्यास संबंधित व्यक्ती उमेदवार असली तरी तिला माफ केले जाणार नाही,असा स्पष्ट इशारा पुणे पोलिसांनी दिला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांच्या सोशल मीडियावरील पोस्ट्स, व्हिडिओ आणि संदेशांवरही पुणे पोलिसांची विशेष नजर आहे. द्वेषमूलक भाषण, धमकी, कायदा–सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या पोस्ट्सवर तात्काळ कारवाई केली जाणार आहे. या सर्व गंभीर मुद्द्यांवर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी माहिती दिली आहे.

**पुण्यात पक्षांनी गंभीर गुन्ह्यांतील कोणत्या आरोपींना दिली उमेदवारी**

पुण्यातील सर्वात जुनी आणि कुख्यात समजल्या जाणाऱ्या आंदेकर टोळीतील सदस्यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी दिली आहे.



सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर: प्रभाग २३ मधून या दोघी निवडणूक लढवत आहेत. विशेष म्हणजे, आयुष्य कोमकर हत्येचा कट रचल्याच्या आरोपाखाली या दोघी सध्या येरवडा कारागृहात आहेत.

**बंडू आंदेकर :** टोळीचा प्रमुख बंडू आंदेकर हा देखील याच प्रकरणात अटकेत आहे. तो पोलिसांच्या कड्या पहऱ्यात आणि हातात बेड्या असलेल्या स्थितीत उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आला होता. संपूर्ण आंदेकर कुटुंबावर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने प्रभाग ३९ मधून बापू नायरला उमेदवारी दिली आहे. बापू नायरवर हत्या, अपहरण आणि खंडणी यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

भाजपकडूनही गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या नातेवाईकांना संधी देण्यात आली आहे. अनेक गंभीर गुन्ह्यांत अडकलेल्या आरोपींच्या पत्नींना भाजपने उमेदवारी दिली आहे. कुख्यात गजा मारणेची पत्नी जयश्री मारणे यांनीही यापूर्वी निवडणूक लढवली असून, त्यांच्या माध्यमातून गुन्हेगारी विश्वाचा राजकारणात हस्तक्षेप वाढल्याचा आरोप होत आहे. त्यानंतर रोहिदास चोरघे यांची पत्नी प्रतिभा चोरघे यांना भाजपने संधी दिली आहे. रोहिदास चोरघेवर हत्या, अपहरण, पोलिसांवर हल्ला आणि गोळीबाराचे अनेक गुन्हे नोंद आहेत. संदीप बांदल हत्या प्रकरणातही त्याचे नाव होते. फरारी असतानाही त्याने अनेक ठिकाणी गोळीबार करून दहशत निर्माण केली होती.

**पिंपरीत गुन्हेगारी पार्श्वभूमीचे ३४ उमेदवार रिंगणात**

पिंपरी–चिंचवड महापालिका निवडणुकीत उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी अनेक पक्षांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी दिली आहे. कागदावर स्वच्छ प्रतिमा असणारे पण पोलिसांच्या रेकॉर्डमध्ये राजकीय गुंड असा उल्लेख असणारे १७ जण सध्या पिंपरी–चिंचवड महापालिकेची निवडणूक लढवत आहेत. यांच्यासोबत गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे ३४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यात दोन महिलांचा समावेश आहे.

गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांमध्ये भाजपचे १७, राष्ट्रवादी काँग्रेसचे १३, शिवसेनेचे ४ जण आहेत. यात दोन महिला उमेदवारही आहेत.पोलिसांच्या दप्तरी राजकीय गुंड म्हणून नोंद असणारे भाजपचे ८, राष्ट्रवादीचे ७ आणि शिवसेनेच्या २ जणांचा समावेश आहे. तर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ८ पती राजांच्या पत्नी उमेदवार म्हणून रिंगणात आहेत.

**सायं दैनिक नवीन संध्या** हे वृत्तपत्र पृथ्वी इंटरप्रायजेस करीता मुद्रक - प्रकाशक सौ. संगीता सम्राट परदेशी यांनी पृथ्वी इंटरप्रायजेस, ११३ महात्मा फुले पेठ, पुणे ४११०४२ येथे छापून २०, शिवाजीनगर, पुणे-४११००५ येथे प्रसिद्ध केले.

संपादक - संगीता सम्राट परदेशी परदेशी

**प्रशासकीय कार्यालय** -११३, महात्मा फुले पेठ, पुणे -४११०४२

फोन नं. (०२०) २६३८१७०२. E-mail - tbssbs@gmail.com

* या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत. (कायदेशीर सल्लागार-ॲड. भागचंद चुनीलाल पालरेचा)

**पिंपरी कार्यालय**-फ्लॅट नं.६०२, बिल्डींग नं. एफ-२ यूनिट बिंग-२, जय गणेश साम्राज्य,नाशिक-पुणे रोड पांजरपोळ समोर, भोसरी,पिंपरी- ४११०३९

(दैनिक नवीन संध्या मध्ये छापलेल्या जाहिरातीच्या सत्यते बाबत मालक/प्रकाशक/संपादक जबावदार नाही.) स्थापना दिनांक ०१/१२/२०१०

# पालखी मार्ग सुसाट: हडपसर ते सासवड आता फक्त २० मिनिटे

**पुणे :** हडपसरहून सासवडला जाण्यासाठी आता केवळ वीस ते पंचवीस मिनिटांचा अवधी लागणार आहे. या मार्गावर रस्ता रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू असून काही महिन्यांत हे काम पूर्णत्वास जाणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पुढील पन्नास वर्षांचा या मार्गावरून होणाऱ्या वाहतुकीचा विचार करून तब्बल आठ मार्गिका तयार करीत आहे, तर दिवेघाटात दोन्ही बाजूने मिळून सहा मार्गिकेचे काम सुरू आहे. दिवेघाटात काम करणे आव्हानात्मक असले तरीही महामार्ग प्राधिकरणाने ही जबाबदारी लिलया सांभाळली आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी महामार्गाच्या हडपसर ते दिवेघाट हा टप्पा १३.२५ किलोमीटर लांबीचा आहे. या मार्गावर पूर्वी दोन मार्गिकेचा रस्ता होता. त्यामुळे नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. शिवाय आषाढीवारीच्या वेळी माऊलीच्या पालखीसोबत जाणाऱ्या वारकऱ्यांनादेखील अरुंद रस्त्यामुळे त्रास होत होता.पालखी मार्गाचे विस्तारीकरण करताना हडपसर ते दिवेघाट या टप्प्याचे काम काही तांत्रिक कारणांमुळे उशिरा सुरू



झाले. आता मात्र या कामाने प्रचंड वेग घेतला आहे. हा मार्ग दोन मार्गिकांवरून आठ मार्गिकांमध्ये रूपांतरित होत आहे. यात दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्याचादेखील समावेश आहे. सेवा रस्त्यामुळे परिसरातील स्थानिक नागरिक, दुकानदार, व्यापारी यांच्यासाठी हे अत्यंत सोयीचे ठरणार आहे.

उड्डाणपूल, भुयारी रस्त्यामुळे वेळ वाचणारया मार्गावर मंतरवाडी ते साडी सेंटरदरम्यान सुमारे एक किलोमीटर लांबीचा उड्डाण पूल बांधण्याचे काम सुरू आहे. तर वडकी, उरुळी देवाची, फुरसुंगीसह अन्य एका ठिकाणी भुयारी रस्त्याचे (अंडरपास) काम सुरू आहे. शिवाय फुरसुंगी येथील रेल्वे उड्डाण पुलाचे (आरओबी) विस्तारीकरण केले जात आहे. येत्या काही महिन्यांत याचे काम पूर्ण होणार आहे.

पुरंदर विमानतळासाठी सोयीचा मार्गप्रस्तावित पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहणाचे काम सुरू आहे. पुरंदर विमानतळ सुरू झाल्यावर या मार्गावरून पुरंदरला जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत मोठी वाढ होणार आहे. शिवाय या मार्गावरून सोलापूर, पंढरपूरसाठीदेखील मोठी वाहतूक होणार आहे. चांगला रस्ता व रुंदीकरण झाल्याने हा प्रवास वेगवान तर होणारच आहे, शिवाय तो सुरक्षितदेखील असणार आहे. दिवेघातील तीव्र वळणेदेखील कमी करण्यात येत आहेत.

हडपसर ते दिवेघाटदरम्यानचा हा टप्पा पालखी महामार्गाच्या दृष्टीने अतिशय आव्हानात्मक आणि महत्त्वाचा आहे. सध्या आम्ही दिवेघाटातील अवघड वळणे कमी करणे आणि रस्ता रुंदीकरणासाठी डोंगराचा छोटे भाग कापण्याचे काम वेगाने करत आहोत. २०२६च्या पालखी सोहळ्यापूर्वी या मार्गातील जास्तीत जास्त काम पूर्ण करून वारकऱ्यांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित मार्गिका उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.

# आरक्षण विकास आराखडा: राज्य सरकारने टीडीआर धोरणात केले बदल



**पुणे :** विकास आराखड्यातील आरक्षण विकसित करण्याच्या मोबदल्यात देण्यात येणाऱ्या 'टीडीआर' (हस्तांतरित विकास हक्क) धोरणात राज्य सरकारने नव्याने बदल केला आहे. त्यामुळे एखादी आरक्षणाची जागा मालकाऐवजी त्रयस्थ व्यक्तीने विकसित करून दिल्यास त्याचा मोबदला म्हणून विकसकाला 'कंस्ट्रक्शन टीडीआर' देण्याची नवी तरतूद नियमावलीत केली आहे. त्यामुळे विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेली सुविधांची आरक्षणे गतीने विकसित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

हद्दीचा विकास आराखडा तयार करण्याची जबाबदारी राज्य सरकारने महापालिकांवर दिली आहे. या आराखड्याच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी विविध प्रकाराची आरक्षणे आराखड्यात प्रस्तावित केली जातात. ही आरक्षणे महापालिकेकडून विकसित करून नागरिकांना सुविधा पुरविल्या जातात.

खासगी जागेवर आरक्षण टाकण्यात आल्यानंतर त्या जागा ताब्यात घेण्यासाठी पूर्वी महापालिकांकडून रोख मोबदला दिला जात होता. त्यामुळे आरक्षणे विकसित करण्यास महापालिकांना मर्यादा येत होती. त्यामुळे १९९७ मध्ये राज्य सरकारने रोख मोबदल्याशिवाय 'टीडीआर'चा पर्याय पुढे आणला. त्यामुळे आरक्षणाच्या जागा महापालिकेच्या ताब्यात देण्याचे प्रमाण वाढले.

जागा ताब्यात आली, तरी त्या जागेवरील आरक्षण विकसित करण्यास महापालिका कमी पडू लागल्या. त्यानंतर काही आरक्षणाच्या जागा विकसित व्हाव्यात, यासाठी २०१६ मध्ये 'समायोजन आरक्षणा'ची तरतूद बांधकाम नियमावलीत केली.त्यामुळे ज्या मालकांच्या जागेवर आरक्षण पडले आहे, त्यांनी ते आरक्षण विकसित करून महापालिकेच्या ताब्यात दिले, तर त्याच्या मोबदल्यात जागा मालकाला जागेचा आणि बांधकामासाठी आलेल्या खर्च विचारात घेऊन 'टीडीआर' दिला जातो. त्यामुळे ज्यांच्या जागेवर आरक्षण आहे आणि ते मालकाने विकसित केले, तर त्यांना मोबदला देण्याची तरतूद असल्यामुळे त्यातही काही अडचणी येत होत्या.

राज्य सरकारने 'यूडीसीपीआर' नियमावलीत बदल करत, जागा मालकाव्यतिरीक्त त्रयस्थ व्यक्तीने आरक्षण विकास करून महापालिकेच्या ताब्यात दिल्यास संबंधितांना त्यांच्या मोबदल्यात 'टीडीआर' देण्याची नव्याने तरतूद केली. याबाबतचे आदेश नगरविकास विभागाचे उपसचिव प्रणव कर्पे यांनी काढले आहेत. त्यामुळे विकास आराखड्यातील आरक्षणे गतीने विकसित होण्यास मदत होणार आहे.

महापालिकेचा खर्च कमी होणार'यूडीसीपीआर' नियमावलीत ही नव्याने तरतूद करताना राज्य सरकारने आरक्षणाच्या जागामालकाला प्रथम संधी दिली आहे. त्यांनी नकार दिल्यास त्रयस्थ व्यक्तीला आरक्षण विकसित करता येणार आहे. तसेच, आराखड्यातील यापूर्वीच आरक्षणाच्या जागा महापालिकेच्या ताब्यात आल्या आहेत. परंतु, महापालिकेने अद्यापही त्या जागेवरील आरक्षण विकसित केले नाही. अशा जागा महापालिका 'टीडीआर' देण्याच्या मोबदल्यात त्रयस्थ व्यक्तींकडून विकसित करून घेऊ शकणार आहे. जेणेकरून महापालिकेच्या तिजोरीवरील भार कमी होण्यास मदत होणार आहे.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या ११ विश्वस्तांवर फौजदारी कारवाई

**पुणे :** गर्भवती महिलेच्या मृत्यू प्रकरणाबाबत पुण्याच्या सहधर्मादाय आयुक्तांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या ११ विश्वस्तांविरुद्ध फौजदारी कारवाई (अभियोग) करण्याची शिफारस करत शिवाजीनगर प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात खटला दाखल केला आहे. रुग्णालयाने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील तातडीच्या वेळी रुग्णाला वैद्यकीय उपचार द्यावे, धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णाकडून कोणतीही अनामत रक्कम घेवू नये, अशा नियमांचे उल्लंघन केल्याचे निष्कर्ष नोंदवत हा खटला दाखल करण्यात आला आहे.

ईश्वरी भिसे या गर्भवतीला गेल्यावर्षी एप्रिल २०२५ मध्ये दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीच्या प्रसूतीसाठी दाखल केले होते. मात्र, उपचार सुरू करण्यापूर्वी रुग्णालयाने अनामत रकमेची मागणी केल्याचा आरोप नातेवाइकांनी केला होता. त्यानंतर ईश्वरीला नातेवाईक इतर रुग्णालयात घेऊन गेले; मात्र उपचारांमध्ये उशीर झाल्याने तिचा मृत्यू झाला. या प्रकरणाची दखल घेत सह धर्मादाय आयुक्त कार्यालयाने स्वत:हून चौकशी केली.

सर्व विश्वस्तांचे जबाब नोंदवलेहा आदेश महाराष्ट्र सार्वजनिक ट्रस्ट अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन ६६ (ब) नुसार ट्रस्ट, विश्वस्त, व्यवस्थापक किंवा संबंधित व्यक्ती यांनी अधिनियमातील काही महत्त्वाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कारवाई करता येते.धर्मादाय उपायुक्त डॉ. राजेश परदेशी, रुग्णालय विभागाचे अधीक्षक दीपक खराडे आदींच्या चौकशी समितीने रुग्णालयाच्या नोंदी, उपचारांची वेळ, वैद्यकीय निर्णय प्रक्रिया आणि रुग्णालय व्यवस्थापनाची भूमिका यांची पडताळणी केली आणि सर्व विश्वस्तांसह संबंधितांचे जबाबही नोंदवले. त्यानंतर सहधर्मादाय आयुक्त रजनी क्षीरसागर यांनी खटला दाखल करण्याचा आदेश दिला.

महाराष्ट्र सार्वजनिक ट्रस्ट अधिनियमातील कलम ४१ (अअ) व ६६ (ब) :४१(अअ) : धर्मादाय कायद्याखाली नोंदणीकृत रुग्णालयात अल्प उत्पन्न गटातील रुग्णांना अल्पदरात उपचार आणि निर्धन रुग्णांना मोफत उपचार देण्याबाबत हे कलम आहे. याचे उल्लंघन केल्यास आणि त्यात दोषी आढळल्यास २५ हजार रुपये दंड आणि एक वर्षाचा कारावास किंवा दोन्ही अशी शिक्षा आहे.

६६ (ब) : कलम ४१ (अअ) नुसार दिलेल्या निर्देशांचे उल्घंन केल्यास या कलमांनुसार फौजदारी कारवाई होते. यात गुन्हा सिद्ध झाल्यास एक वर्ष कारावास आणि ५० हजार हजार रुपये दंड किंवा अशी शिक्षा आहे. मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिका २००६ व २००९ नुसार धर्मादाय रुग्णालयांत वैद्यकीय उपचारांसाठी योजना तयार केली आहेतातडीच्या रुग्णांना धर्मादाय रुग्णालयाने उपचार द्यावेत.

## अग्रलेख....

# मोकाट ट्रम्प

अमेरिकेच्या आर्थिक हितसंबंधांसाठी जगाच्या सगळ्या जबाबदाऱ्या झटकून टाकण्याची आणि अमेरिकेची प्रतिष्ठा जगात पुन्हा प्रस्थापित करण्याचा शब्द अमेरिकनांना देऊन निवडून आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांची पावलं प्रत्यक्षात भलतीकडेच पडू लागली आहेत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला त्यांच्याच घरातून शिताफीने उचलून जेरबंद केल्यापासून ट्रम्प यांचा वाह्यात आत्मविश्र्वास भलताच वाढला आहे. आपल्या एकाच वक्तव्यात परवा त्यांनी निम्म्या जगाला धमकावलं; त्यात भारताचाही समावेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी एक वाक्य चांगलं बोलताना त्यांनी पुढे जी मुक्ताफळं उधळली, ती भारताच्या प्रतिष्ठेला आव्हान देणारी आहेत. 'ट्रम्प यांना खूश ठेवणं आवश्यक आहे, हे मोदी चांगलं जाणतात' असं म्हणताना ट्रम्प यांनी पुढे रशियाकडून घेतलं जाणारं कच्चं तेल पूर्णपणे थांबवलं नाही, तर भारतावर आणखी कितीतरी पट आयात कर लादू, अशी धमकी दिली आहे. ट्रम्प आणि मोदी हे दोघेही दोन सार्वभौम राष्ट्रांचे प्रमुख आहेत. त्यांच्यातील संबंधांचे मुख्य कारणही तेच आहे. त्यामुळे, जे अत्यंत जबाबदारीचे संबंध आहेत, त्या संबंधांबद्दल बोलताना ट्रम्प यांनी त्यात ज्या प्रकारे दोन देशांची प्रतिष्ठा गुंफली, ते अत्यंत निषेधार्ह आहे. अर्थात ट्रम्प यांना अशा गोष्टींचा विधीनिषेध नाही. ते तो पाळत नाहीत, हे त्यांच्या यापूर्वीच्या असंख्य विधानांवरून (आणि वर्तणुकीतूनही) सिद्ध झालं आहेच. भारत आणि पाकिस्तानमधला 'ऑपरेशन सिंदूर'वेळचा तणाव निवळवण्याचं श्रेय भारताने आपल्याला द्यावं, यासाठी त्यांनी यापूर्वी केलेले जाहीर प्रयत्न आणि विधानं म्हणजे बालिशपणाचा नमुना होता. मोदी यांनी अत्यंत परिपक्वपणे, मौन पाळून त्याला जो प्रतिसाद दिला, तो लाजवाब होता. यावेळीही तसंच घडेल, यात शंका नाही. प्रश्र्न अन्य देशांचा आहे. भारताने आपल्या 'हो'त 'हो' मिसळावं यासाठी ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिकेतली व्यापारी बोलणी रोखून ठेवली आहेत, हे न कळण्याएवढा भारत दुधखुळा नाही. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी आपल्या देशातल्या मौल्यवान खाणी ट्रम्प यांच्या हवाली करून त्यांची मर्जी संपादन केली. तशी गरज ना भारताला आहे, ना मोदींना. ट्रम्प यांना जितक्या लवकर हे समजेल, तेवढं ते त्यांच्याच हिताचं असेल!

मादुरो यांना जेरबंद केल्यानंतर ट्रम्प यांनी इराण, लॅटिन अमेरिकन देशांसह युरोपलाही एका फटक्यात धमकावलं. डेन्मार्कच्या अखत्यारीत; पण स्वतंत्र अस्तित्व असलेल्या ग्रीनलँडचा ताबा ट्रम्पना हवा आहे. निवडून आल्या आल्या त्यांनी आपला हा मनसुबा जाहीर केला होता. तोच परवा पुन्हा अधिक आग्रहपूर्वक केला. त्याला डेन्मार्कचे पंतप्रधान मेट्टे फ्रेडरिक्सन आणि ग्रीनलँडचे पंतप्रधान जेम्स फ्रेडरीक नेल्सन या दोघांनीही कडक शब्दांत उत्तर दिलं. वास्तविक डेन्मार्क नाटो देशांचा भाग असल्याने त्याच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेचीच आहे. करारानुसार ज्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, त्याचाच घास घेण्याची ही अजब आंतरराष्ट्रीय नीती आहे! ट्रम्प यांच्या या धोरणाविरोधात त्यामुळेच नार्डिक, बाल्टिक देशांसह पूर्ण युरोपातून तत्काळ निषेधाचे सूर उमटले आहेत. ग्रीनलँड हे आर्क्टिक महासागरातलं सर्वात मोठं बेट. ते खनिज संपत्तीने समृद्ध असल्याने ट्रम्प यांचा त्यावर डोळा असणं स्वाभाविक आहे. पण, त्याशिवाय ग्रीनलँड हे सुरक्षेच्या दृष्टीनेही अमेरिकेला महत्त्वाचं आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने डेन्मार्कवर आक्रमण केल्या केल्या अमेरिकेने ग्रीनलँडवर चढाई करून ते ताब्यात घेतलं होतं. युद्धानंतरही बराच काळ अमेरिकन सैन्य तिथे होतं. तिथलं पिटूफ्फीक विमानतळाचं संचलन आजही अमेरिकेकडेच आहे. रशियाने अमेरिकेवर क्षेपणास्त्र डागलीच, तर त्याचा मुकाबला करण्यासाठी अमेरिकेला हा विमानतळ सर्वाधिक उपयोगी आहेच; पण चीन आणि रशियाच्या आर्क्टिक महासागरातील हालचालींना शह द्यायलाही अमेरिकेच्यादृष्टीने ग्रिनलँड महत्त्वाचं आहे.

# तासिका मानधनावर तज्ज्ञ शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती

**पुणे :** युपीएससी मार्फत होणाऱ्या कंम्बाईन्ड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन-२०२६ (सीडीएस) च्या तयारीसाठी नाशिक रोड येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान (भूगोल, इतिहास, भारतीय राजकारण) तसेच सामान्य विज्ञान (अर्थशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) या विषयावरील तज्ज्ञ शिक्षकांची ३०० रुपये प्रती तासिका मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे.

यासाठी शैक्षणिक पात्रता संबंधित विषयातील पदवी, पदव्युत्तर तज्ज्ञ प्राध्यापक असणे व स्पर्धा परीक्षांच्या अध्यापनाचा किमान दोन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.

पात्र उमेदवारांनी दिनांक ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता संपूर्ण कागदपत्रांसह मुलाखतीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित राहावे, असे आवाहन ले. कर्नल विलास शंकर सोनवणे (नि.), प्रभारी अधिकारी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी ९१५६०७३३०६ किंवा ०२५३-२४५१०३२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# बजाज पुणे ग्रँड टूरला विक्रमी प्रतिसाद – आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही भक्कम पाठिंबा

**पुणे :** पहिली 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' ही पुरुषांची आंतरराष्ट्रीय सायकलिंग शर्यत नवा इतिहास घडवण्यासाठी सज्ज झाली आहे. युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलच्या (यूसीआय २.२ श्रेणी) मान्यतेखाली होणाऱ्या या शर्यतीत पाच खंडांतील ३५ देशांचे प्रतिनिधित्व करणारे २९ संघ आणि १७१ एलिट सायकलपटू सहभागी होणार आहेत. आंतरराष्ट्रीय सायकलिंग विश्र्वाकडून मिळालेला हा अभूतपूर्व प्रतिसाद पुण्याला जागतिक स्तरावर एक प्रमुख 'प्रोफेशनल सायकलिंग सर्किट' म्हणून स्थापित करत आहे. ही शर्यत १९ ते २३ जानेवारीदरम्यान होणार आहे.

पुणे जिल्हा प्रशासनाच्या पुढाकाराने आणि महाराष्ट्र सरकारच्या भक्कम पाठिंब्याने आयोजित ही पाच दिवसांची, ४३७ किलोमीटरची शर्यत असून, यात एक 'प्रोलॉग' (सुरुवातीचा आठ किलोमिटरचा छोटा टप्पा) आणि चार प्रमुख टप्प्यांचा समावेश आहे. या



शर्यतीदरम्यान सायकलपटू पुण्याच्या ऐतिहासिक स्थळांपासून ते दख्खनच्या पठारावरील आव्हानात्मक घाटांपर्यंत विविध भूप्रदेशांतून वाटचाल करतील.

या शर्यतीत फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, बेल्जियम, जर्मनी, नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, चीन आणि थायलंडसारख्या दिग्गज सायकलिंग राष्ट्रांचे संघ सहभागी होणार आहेत. खंडांनुसार पाहता, आशियातून सर्वाधिक ७८ खेळाडू, युरोपमधून ६९, ओशनियामधून १२, अमेरिकेतून ६ आणि आफ्रिकेतून ६ खेळाडू पुण्यात दाखल होणार आहेत.

**नवे मापदंड प्रस्थापित**

सामान्यत: यूसीआय २.२ श्रेणीतील शर्यतींमध्ये जास्तीत जास्त १२५ सायकलपटू सहभागी असतात. मात्र, बजाज पुणे ग्रँड टूरने १७१ स्पर्धकांसह नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. यामध्ये ओडिशामध्ये झालेल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेतून निवडलेल्या सहा भारतीय सायकलपटूंच्या संघाचाही समावेश आहे.

**अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया**

पुणे जिल्हाधिकारी आणि या दौऱ्याचे प्रभारी अधिकारी श्री. जितेंद्र डुडी म्हणाले, पुणे आणि भारतासाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. आम्ही जागतिक दर्जाची शर्यत आयोजित करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहोत. ही केवळ एक स्पर्धा नसून, या निमित्ताने व्यावसायिक सायकलिंगच्या जगात भारताचा उदय होणार आहे पुण्याला एकेकाळी सायकलिंगचे शहर म्हणून ओळखले जात होते. ही जुनी ओळख पुन्हा मिळवून देताना आम्हाला अभिमान वाटतो. १२० वर्षांचा वारसा असलेल्या 'टूर डी फ्रान्स' या शर्यतीकडून आम्ही प्रेरणा घेतली आहे.

शर्यतीचे तांत्रिक संचालक श्री. पिनाकी बसाक म्हणाले, यूसीआय २.२ श्रेणीत १७१ खेळाडूंचा सहभाग असणे हे अभूतपूर्व आहे. पहिल्याच वर्षी भारताने हे साध्य करणे ही जागतिक सायकलिंगसाठी मोठी घटना आहे. पुण्याचा आव्हानात्मक भूप्रदेश आणि जिल्हा प्रशासनाने विक्रमी वेळेत उभारलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधांमुळे हे शक्य झाले आहे.

**चार टप्पे, एक मोठे आव्हान**

४३७ किलोमीटरची ही शर्यत पुण्याच्या शहरी भागातून तसेच सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंत नेण्यात आली आहे. यात गुडलक चौक ते डेक्कन बस स्टॉपदरम्यानचा आठ किलोमीटरचा प्रोलॉग असेल.

**टप्पा १ :** मुळशी–मावळ माइल्स (९१.८ किमी)

हिंजवडी आयटी हबमधून जाणारा हा टप्पा वेग आणि शहरी वळणांची कसोटी पाहणारा असेल.

**टप्पा २ :** मराठा हेरिटेज सर्किट (१०९.१५ किमी)

पुरंदर किल्ला, सिंहगड आणि खडकवासला परिसरातील कठीण घाट व चढण्या खेळाडूंच्या सहनशक्तीची परीक्षा घेतील.

**टप्पा ३ :** पश्चिम घाट गेटवे (१३७.०७ किमी)

सासवड ते बारामतीदरम्यानचा हा टप्पा सपाट भूप्रदेश आणि वेगवान सायकलिंगसाठी ओळखला जाईल.

**टप्पा ४ :** पुणे प्राइड लूप (९९.१५ किमी)

अंतिम टप्पा पुणे शहराच्या मध्यभागातून, शनिवारवाड्यासारख्या ऐतिहासिक स्थळांजवळून जात, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी संपन्न होईल.

बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ हा भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी एक निर्णायक क्षण ठरणार असून, या शर्यतीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून आहे.

# पुणे मनपा निवडणूक संकेतस्थळाला अभूतपूर्व प्रतिसाद; एका दिवसात एक लाख नवीन भेटी

**पुणे :** पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर माहिती व तंत्रज्ञान विभागा मार्फत नागरिक, मतदार व उमेदवारांच्या सोयीसाठी स्वतंत्र आणि सुस्पष्ट निवडणूक संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून pmc.gov.in या संकेतस्थळाला अल्प कालावधीतच अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.या संकेतस्थळावर निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व आवश्यक माहिती वेळेत, पारदर्शकपणे आणि एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये नामनिर्देशन प्रक्रिया व त्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे, निवडणूक कार्यक्रम, निवडणूक निर्णय अधिकारी यांची माहिती, उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र, मतदार यादी तसेच प्रभाग रचना आराखडा यांचा समावेश आहे. त्यामुळे मतदार आणि उमेदवारांना आपल्या प्रभागाशी संबंधित माहिती सहजपणे पाहता येत आहे.

pmc.gov.in या संकेतस्थळावर मताधिकार अँप, ना–हरकत प्रमाणपत्र (NOC) साठी स्वतंत्र प्रणाली, प्रचार परवानग्यांसाठी एक खिडकी कक्ष, तसेच मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे पोर्टल अशा उपयुक्त डिजिटल लिंक्स एकत्रितपणे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामुळे निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणे अधिक सुलभ झाले आहे.

सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ साठीच्या pmc.gov.in या स्वतंत्र संकेतस्थळाला आतापर्यंत ४ लाखांहून अधिक भेटी प्राप्त झाल्या असून, केवळ एका दिवसात सुमारे एक लाख नवीन भेटी नोंदविण्यात आल्या आहेत. हे आकडे संकेतस्थळावरील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग अधोरेखित करतात. तसेच उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र प्रसिद्ध करण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या नव्या डिजिटल प्रणालीद्वारे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयांमार्फत उमेदवारांचे प्रतिज्ञापत्र संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत. प्रतिज्ञापत्र प्रसिद्ध झाल्यानंतर काहीच दिवसांत संकेतस्थळाला ५४,००० हून अधिक प्रतिज्ञापत्र डाउनलोड झाले असून नागरिकांचा माहितीप्रती असलेला वाढता उत्साह यावरून स्पष्ट दिसून येतो.

निवडणूक प्रक्रियेमध्ये डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा पुणे महानगरपालिकेचा हा उपक्रम मतदार जागृती आणि निवडणूक पारदर्शकतेसाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे. िल.र्सी.ळप हे संकेतस्थळ मा. महापालिका आयुक्त श्री. नवल किशोर राम, मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) श्री.ओमप्रकाश दिवटे, मा.उपायुक्त (निवडणूक विभाग) श्री. प्रसाद काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आले असून नागरिकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे असे मा. माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख श्री. राहुल जगताप यांनी सांगितले.

# पीएमपीचे आता चालकांना शिस्तीचे 'धडे'! प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी नवीन नियमावली

**पुणे :** पुणे व पिंपरी–चिंचवड शहरासह ग्रामीण भागात प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पीएमपी प्रशासनाने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांत पीएमपीमधील भाडेतत्वावरील बसच्या अपघातांमध्ये वाढ झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. याशिवाय पीएमपीची प्रतिमा देखील मलिन झाली आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी पीएमपी प्रशासनाने चालकांसाठी नवीन नियमावली लागू केली आहे. पीएमपी प्रशासनाने बस चालकांसाठी नवीन नियमावली लागू करताना चालकांना विविध स्तरावर खबरदारी घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत काही उपाययोजना सुचविल्या आहेत.

**नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई**

प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या निष्काळजी चालकांना पाठीशी घातले जाणार नाही. जर एखादा चालक वाहतुकीच्या नियमांचे पालन न करता बस चालविताना आढळला, तर संबंधित कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. हे निर्देश महामंडळाचे चालक आणि सर्व ठेकेदारांच्या चालकांनाही लागू करण्यात आले आहेत.अपघातांचे प्रमाण वाढले आहे. भाडेतत्वावरील बस चालकांना शिस्त लावणे आवश्यक झाले आहे. सर्व आगार व्यवस्थापकांना प्रत्येक आठवड्याला चालकांचे प्रबोधन करण्याचे आदेश दिले आहेत. चालक निष्काळजीपणे बस चालविताना आढळला, तर त्याच्यासह ठेकेदारावर कडक कारवाई केली जाईल.

**या आहेत उपाययोजना...**

दर आठवड्याला आगारस्तरावर दोन्ही शिफ्टमधील चालकांसाठी 'गेटमिटिंग' घेऊन त्यांना सुरक्षित प्रवासाबाबत मार्गदर्शन करणेबसस्थानक, भाजी मंडई, सिग्नल, चौक आणि पादचारी मार्गांजवळ बसच्या वेगावर नियंत्रण ठेवणे अनिवार्यपीएमपी बस ताशी ६० किलोमीटरपेक्षा अधिक वेगाने धावण्यास बंदीवाहतूक कोंडी आणि अपघात टाळण्यासाठी चालकांनी बस रस्त्याच्या डाव्या बाजूच्या लेनमध्येच चालविण्याच्या सूचनाबीआरटी मार्गातील पंक्चर चौक आणि उड्डाण पुलाजवळील सेवा रस्त्यावर बस चालविताना घ्यावी लागणार खबरदारीबस बंदचे प्रमाण (डिसेंबर) ४५९ – पीएमपी९०७ – भाडेतत्त्वावरील

# एमपीएड व एमएड सीईटी २०२६ नोंदणीला सुरुवात; २० जानेवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज

**पुणे :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६ मध्ये घेतल्या जाणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी एमपीएड व एमएड या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सीईटीच्या प्रवेश नोंदणीस ५ जानेवारीपासून सुरुवात झाली आहे. या दोन अभ्यासक्रमाच्या सीईटीपासून २०२६ च्या सीईटी नोंदणीस प्रारंभ झाला आहे. ही नोंदणी २० जानेवारीपर्यंत ऑनलाइन होणार आहे. इतर अभ्यासक्रमाच्या सीईटी नोंदणीसही लवकरच सुरुवात होणार आहे.

या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज, नोंदणी वेळापत्रक आणि माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या http://mahacahet.org/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

ही सीईटी राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन घेतली जाईल. मागील वर्षी या दोन प्रवेश परीक्षेत ६ हजार १९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. एमपीएडची सीईटी २४ मार्चला, एमपीएड फिल्ड टेस्ट २५ मार्चला एमएडची सीईटी २५ मार्चला घेण्यात येणार असल्याचे सीईटी सेलने यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

नोंदणीसाठी अपार आयडी व यूडीआयडी बंधनकारकविद्यार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध व्हावी, तसेच त्यांची पडताळणी करणे सहज शक्य व्हावे. यासाठी सीईटी सेलने प्रवेश परीक्षा नोंदणीसाठी ऑटोमेटेड पर्मनंट कॅडेमिक अकाउंट रजिस्ट्री (अपार) आयडी व दिव्यांग विद्यार्थ्यांना युनिक डिसबिलिटी आयडी (यूडीआयडी) बंधनकारक केला आहे. विद्यार्थ्यांनी सीईटीमध्ये नोंदणी करताना अपार आयडी व यूडीआयडीची नोंदणी करावी.

यावरून विद्यार्थ्यांची पडताळणी केली जाणार आहे. ज्या उमेदवारांनी अद्याप त्यांचा अपार आयडी तयार केलेला नाही त्यांनी तो डिजीलॉकरद्वारे तयार करावा. उमेदवारांनी पुढील अद्ययावत माहिती, तपशीलवार वेळापत्रक आणि परीक्षेशी संबंधित सूचनांसाठी नियमितपणे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सीईटी कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी स्पष्ट केले आहे.

# बदलीसाठी तीन लाखांची लाच! पुणे जिल्हा परिषद आरोग्यसेवक अटकेत, उपसंचालक अडचणीत

**पुणे :** कोल्हापूर आरोग्य परिमंडळातून पुणे परिमंडळात आरोग्यसेवकाच्या बदलीसाठी तीन लाख रुपयांची लाच स्वीकारताना पुणे जिल्हा परिषदेचे आरोग्यसेवक रामकिसन गंगाधर घ्यार याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. त्यानंतर सुरू झालेल्या चौकशीत आरोपी आणि उपसंचालक डॉ. भगवान पवार यांचा फोनवरून बरेचदा संपर्क आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे डॉ. पवार यांच्या अडचणीत वाढ झाली असून, त्यांची चौकशी होणार आहे. दरम्यान, डॉ. पवार सोमवारी तातडीने मुंबईला रवाना झाल्याचे समजते.

तक्रारदार आरोग्यसेवकाची गेल्या वर्षी जून महिन्यात पुण्यात बदली झाली. त्याने इंदापूरमधील प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त पदी बदलीसाठी अर्ज केला होता. परंतु, डॉ. भगवान पवार यांनी तक्रारदाराला नवीन प्रशासकीय इमारतीतील आरोग्य उपसंचालक कार्यालयात रुजू करून घेतले. घ्यार हा कर्मचारी डॉ. भगवान पवार यांच्या संपर्कातील असून, त्याला भेटण्याबाबत डॉ. पवार यांनी सांगितल्याची नोंद लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली आहे. आरोपी घ्यार यानेही चौकशीत 'साहेबां'च्या सांगण्यावरून व्यवहार केल्याची कबुली दिल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

तक्रारदाराने डॉ. पवार यांच्याकडे बदलीच्या ऑर्डरसाठी वारंवार विनंती केली. मात्र, त्याला वेगवेगळी कारणे सांगून उपसंचालक कार्यालयात थांबवून घेतले. त्याला इतक्या महिन्यांचा पगारही देण्यात आला नाही. तक्रारदाराचे वडील आजारी असल्याने त्यांच्यावरील उपचारांसाठी चार–पाच लाख रुपये खर्च झाला होता. त्यामुळे पुन्हा बदलीसाठी पैसे भरावे लागतील, असे समजल्यावर त्याच्यासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले.

दरम्यान, अटक केलेल्या आरोपीने त्याच्या मागे पैशांसाठी तगादा लावला होता. अखेर आरोपीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधला आणि संबंधित प्रकरण समोर आले. डॉ. भगवान पवार कोरोना काळात पुणे जिल्हा परिषदेत जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होते. तेव्हापासून आरोपी डॉ. पवार यांच्या मर्जीतील असल्याचे बोलले जाते. याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी डॉ. भगवान पवार यांना फोन केला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

तक्रारदार बदलीबाबत विनंती करण्यासाठी डॉ. भगवान पवार यांच्याकडे गेला असता, त्यांनी 'राम'ला जाऊन भेट असे सांगितले. ऑगस्टमध्ये भेट झाल्यापासून त्यांनी वारंवार वेगवेगळी कारणे देत बदली रोखून धरली. त्याच दरम्यान, १८ बदल्यांची ऑर्डर काढल्याचे समजले.

शेवटी नाईलाजाने तक्रारदार घ्यार याच्याकडे गेला. त्याने तीन लाख रुपये लागतील, असे सांगितले. कारवाईदरम्यान पुणे विभागातील बदल्यांसाठी तीन एजंट कार्यरत असल्याचे समजले. सध्या इतर एजंट रडारवर आहेत.

# निवडणूक शांततेत व सुरळित पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करा : पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे

**पिंपरी :** आगामी महापालिका निवडणूक शांततापूर्ण, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. तर महापालिका निवडणूक प्रक्रिया ही केवळ प्रशासनाची नव्हे तर नागरिकांचा विश्र्वास जपण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे महापालिका निवडणुकीचे कामकाज करणाऱ्या अधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनासोबत समन्वय ठेवत निवडणूक व्यवस्थापन, सुविधा आणि कायदेशीर बाबींची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी, असे निर्देश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून मतमोजणी १६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. या अनुषंगाने पोलिस प्रशासन व महापालिका प्रशासन यांची संयुक्त बैठक पोलिस आयुक्त कार्यालयात पार पडली.



बैठकीला निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांच्यासह पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली, सारंग आवाड, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे,उत्पादन शुल्क अधिक्षक अतुल कानडे, उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सुप्रिया डांगे, हनुमंत पाटील, डॉ. दिप्ती सूर्यवंशी, अर्चना पठारे, हिम्मत खराडे,अनिल पवार,नितीन गवळी, पल्लवी घाडगे, आचारसंहिता कक्ष प्रमुख सुरेखा माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, पोलीस उपायुक्त श्र्वेता खेडकर, डॉ. शिवाजी पवार, विशाल गायकवाड, संदीप अटोळे यांच्यासह महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार,उपायुक्त अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, कार्यकारी अभियंता हरविंदसिंग बन्सल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पोलिस व महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपायुक्त सचिन पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीला पिंपरी चिंचवड महापालिकेने निवडणूकविषयक केलेल्या तयारीची माहिती दिली. तर पोलिस प्रशासनाच्या वतीने निवडणूकविषयक कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती देण्यात आली.

यावेळी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सांगितले की, महापालिका निवडणूक ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेची कसोटी असते. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा वेळेत, नियमबद्ध आणि पारदर्शकपणे पूर्ण करण्यासाठी विभागनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात येत असून मतदान केंद्रांवरील सुविधा, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि तांत्रिक बाबींवर विशेष भर दिला जात आहे. पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने निवडणूक काळात नागरिकांना सुरक्षित आणि विश्वासार्ह वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा ठाम निर्धार आहे. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे म्हणाले की, निवडणूक शांततेत व सुरळित पार पाडणे ही मोठी जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. यासाठी महापालिका प्रशासनासोबत पोलिस प्रशासनाने समन्वयाने काम करावे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य द्या. शांततापूर्ण मतदानासाठी आवश्यक तेवढा बंदोबस्त, गस्त आणि तांत्रिक निगराणी ठेवण्यात आली आहे, असेही ते म्हणाले.या बैठकीमध्ये निवडणुकीच्या अनुषंगाने लागणाऱ्या पोलिस बंदोबस्तावर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली.

**सर्व पथकांनी दक्ष राहावे**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने एसएसटी, एफएस आणि व्हीएसटी पथके नेमण्यात आली आहेत. आता निवडणुकीतील उमेदवारांचे चित्र स्पष्ट झाले असून सर्व पथकांनी निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी दक्ष राहावे,पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी देखील निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून कामकाज करावे असे निर्देश पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे व महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले आहेत.

## महापालिका निवडणुकीत ३१७ महिला रिंगणात; नारीशक्तीची छाप पडणार का ?

**पिंपरी :** पिंपरी : पिंपरी–चिंचवड महापालिका निवडणुकीत एकूण ६९१ उमेदवार रिंगणात आहेत. यापैकी तब्बल ३१७ महिला उमेदवार नशीब आजमावत आहेत. भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांनी सर्वाधिक महिलांना संधी दिली आहे. अपक्षांमध्येही ६४ महिलांचा समावेश आहे. ५२८ महिलांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी २०८ महिलांनी माघार घेतली.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के महिला आरक्षण असल्याने १२८ पैकी ६४ जागा महिलांसाठी राखीव आहेत. त्यामुळे किमान ६४ महिला सभागृहात प्रवेश करणार हे निश्चित आहे. मात्र, खुल्या जागांवरूनही सहा महिला लढत असल्याने निकालानंतर महिलांची संख्या वाढू शकते. प्रभाग आरक्षण जाहीर झाल्यानंतर अनेक इच्छुकांनी प्रभाग आणि जागा बदलली. पुरुष उमेदवारांनी घरातील महिलांना संधी दिली. काही माजी नगरसेविकांनी खुल्या जागांवरून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला.

**भाजपकडून ६५ महिला उमेदवार**

भाजपने १२८ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. मात्र, तीन उमेदवारांचे एबी फॉर्म उशिरा पोहोचल्याने ते अपक्ष लढत आहेत. यात दोन महिलांचा समावेश आहे. याशिवाय एका महिलेला खुल्या जागेवर संधी दिल्याने भाजपच्या एकूण ६५ महिला उमेदवार रिंगणात आहेत.

**राष्ट्रवादीकडून ६७ महिला उमेदवार**

राष्ट्रवादी (अजित पवार) ने १२१ पैकी ६२ तर राष्ट्रवादी (शरद पवार) ने १३ पैकी ५ महिला उमेदवार आहेत. दोन्ही पक्षांनी प्रत्येकी एका महिलेला खुल्या जागेवर उमेदवारी दिली आहे.

**इतर पक्ष आणि अपक्ष**

काँग्रेस, शिंदेसेना, उद्धवसेना, आप, मनसे, वंचित, बसपा भारतीय कम्युनिस्ट पक्ष, सनय छत्रपती शासन, पिंपरी चिंचवड परिवर्तन आघाडी, नॅशनल रिपब्लिकन पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष आदी पक्षांनीही महिलांना संधी दिली आहे. अपक्ष १६६ उमेदवारांपैकी ६४ महिला आहेत.

**प्रभाग ३० मध्ये २० महिला उमेदवार**

सर्वाधिक २० महिला उमेदवार प्रभाग क्रमांक ३० (कासारवाडी–फुगेवाडी–दापोडी) मध्ये आहेत.

## मतदान जनजागृतीसाठी रील व मिम्स स्पर्धेचे आयोजन

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने येणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत मतदान जनजागृती अभियानांतर्गत नागरिकांच्या सर्जनशील सहभागासाठी रील स्पर्धेसोबतच 'मिम्स स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाहीच्या बळकटीसाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, मतदानाचे महत्त्व अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नागरिकांनी मतदानाचे महत्त्व विशद करणारी सर्जनशील रील तयार करून या स्पर्धेत सहभाग नोंदवायचा आहे.

या स्पर्धेसाठी काही नियम व अटी लागू करण्यात आल्या असून, एका प्रवेशासाठी एकाच रीलला परवानगी देण्यात आली आहे. तयार करण्यात येणारी रील राजकीय आशयविरहित असावी तसेच आदर्श आचारसंहितेचे पालन करणारी असणे आवश्यक आहे. रीलची कालावधी १५ ते ३० सेकंद इतकी असावी. रीलचा आस्पेक्ट रेशो ९:१६ असून ती MP4 फॉरमॅटमध्ये असणे बंधनकारक आहे. रीलमध्ये कोणतेही लोगो, कॉपीराइट चिन्हे किंवा अनधिकृत मजकूर वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच सर्व सहभागी नागरिकांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अधिकृत सोशल मीडिया पेज फॉलो करणे आवश्यक आहे.याशिवाय मिम्स स्पर्धेसाठी काही नियम व अटी लागू करण्यात आल्या असून, एका प्रवेशासाठी एका मिम्सला परवानगी देण्यात आली आहे. तयार करण्यात येणारा मिम्स राजकीय आशयविरहित असावा तसेच आदर्श आचारसंहितेचे पालन करणारा असणे आवश्यक आहे. मिम्समध्ये कोणतेही लोगो, कॉपीराइट चिन्हे किंवा अनधिकृत मजकूर वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच सहभागी नागरिकांनी सर्व प्लॅटफॉर्मवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अधिकृत सोशल मीडिया पेज फॉलो करणे बंधनकारक आहे.

**असे व्हा स्पर्धेत सहभागी**

रील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSfvu4JškjkPlXxBG4zQJšZ0Jl8mc9meh2ZWnXj7VdpOyiw6Nw/viewform या संकेतस्थळाला भेट द्या.

मिम्स स्पर्धेत सहभागी होण्यासाठी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSeG2aZ3GfB-gZq4BCYMo4gNFe864k8qqgQ6WpZaKoyM2wn4Gw/viewform या संकेतस्थळाला भेट द्या.

लोकशाही अधिक सक्षम होण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग आवश्यक आहे. विशेषतः युवकांनी सर्जनशील माध्यमांचा वापर करून मतदानाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवावे, या उद्देशाने रील व मिम्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमातून मतदानाबाबत सकारात्मक संदेश अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास आहे.

**– तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## पीएमआरडीए हद्दीत अग्निशमन विभागाच्या सेवा ऑनलाईन; नागरिकांना मोठा दिलासा




**चिंचवड :** पिंपरी: पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या नऊ तालुक्यातील अग्निशमन विभागसंबंधित कामे जलद आणि विनाअडथळे होणार आहेत. पीएमआरडीएने यापूर्वी १९ ऑनलाईन सेवा सुरु केल्या आहेत. त्यातच आता अग्निशमन विभागाने देखील ऑनलाईन सेवा सुरु केल्या आहेत. त्यामुळे चार सेवा या अर्जदारांना एका क्लिकवर मिळणार आहेत.

पीएमआरडीए हद्दीतील नागरिकांना सुलभ आणि कालमर्यादेत सेवा मिळाव्यात, यासाठी १९ सेवा सुविधा ऑनलाईन सुरु केल्या होत्या. त्यातच आता अग्निशमन विभागाला देखील समाविष्ट करुन घेण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना, अर्जदारांना हे कामे आता घरसबल्या ऑनलाईन करता येणार आहेत. यामुळे पीएमआरडीएच्या कार्यालयापासनू लांब तालुक्यातील नागरिकांना हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

शासनाच्या अधिसूचित सेवा पारदर्शक गतिमान आणि विहीत कालमार्यदेत देण्यासाठी अधिनियम अंमलात आहे. त्याअंतर्गत या सेवा सुरु केल्या आहेत. पहिल्या टप्प्यात विकास परवानगी विभागात बदल करण्यात आले असून, या विभागातील जवळपास १२ कामे हे आता ऑनलाईन स्वरुपात करण्यात आली आहेत.

त्यानंतर जमीन व मालमत्ता विभागात देखील ३ सेवा ऑनलाईन आहेत. मात्र, काही तांत्रिक कारणाअभावी यातील अग्निशमन विभागाच्या सेवा या ऑनलाईन सुरु नव्हत्या त्यामुळे नागरिकांना या ठिकाणी हेलपाटे मारावे लागत होते. आता त्या देखील सेवा या ऑनलाईन सुरु झाल्या आहेत.

**पोर्टलवर सेवा उपलब्ध**

पीएमआरडीच्या संबंधित अग्निशमन विभागातील चार सेवा या आरटीएस या पीएमआरडीएच्या अधिकृत पोर्टलवर उपलब्ध असणार आहेत. यामुळे महत्त्वाचे दाखले आणि परवाने मिळणे अधिक सोईचे होणार आहे. यात पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र, अग्निशमन बंदोबस्त, प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखला, अंतिम अग्निशमन ना हरकत दाखला या सेवा सुरु झाल्या आहेत.

## पुणे महापालिका निवडणुकीत भाजपच आमचा मुख्य विरोधक; नीलम गोऱ्हे यांनी स्पष्टच सांगितलं

**पुणे :** महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन पक्षांच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना आता यात शिंदे सेनेच्या नेत्यांनीही उडी घेतली आहे. शिंदे सेनेच्या नेत्या आणि विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महापालिका निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष असलेला भाजप हा आमचा मुख्य विरोधक असल्याचे नमूद केले आहे.

महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ. गोऱ्हे यांनी मंगळवारी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी महापालिकेच्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष भाजप आमचा प्रमुख विरोधक आहे. मात्र, निवडणुकीचा प्रचार करताना इतर पक्षांवर आरोप प्रत्यारोप न करता विकासाच्या मुद्द्यावर भर देण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पुणे महापालिकेत १९९९ ते २०१४ या काळात काँग्रेस सत्तेत होती, त्यानंतर भाजप सत्तेत आली. शहरात काही सेवा दिल्या गेल्या, मात्र अजूनही अनेक सुविधा देता आल्या असत्या. पाणी पुरवठ्याबाबत दीर्घकालीन दृष्टिकोन नाही. पुणेकरांकडे केवळ रसद पुरवणारा कोटा म्हणून पाहिले गेले, असा आरोपही त्यांनी केला. शहरातील विकासकामे आणि पुणेकरांचे जीवनमान उंचावण्यासाठी आम्ही 'शब्द शिवसेनेचा' या आशयाखाली पुणेकरांसमोर १८ मुद्द्यांचा विकासनामा सादर करणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणेकरांना दिलेला शब्द शिवसेना पूर्ण करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. एकनाथ शिंदे यांची ९ जानेवारीला सभाउपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दोन सभा येत्या ९ जानेवारीला पुण्यात होणार आहेत.

# सुरक्षित वाहतुकीसाठी नियमांचे पालन अनिवार्य! पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे; 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा

**पुणे :** स्वयंशिस्तीमुळे वैयक्तिक स्वातंत्र्यावर मर्यादा येत नसून, प्रत्यक्षात आपले रक्षण होत असते. वाहतूक सुरक्षा ही एक सामूहिक जबाबदारी असून, खरे सामर्थ्य वेगात नसून नियंत्रणात असते. हे तरुणांनी समजून घेतले पाहिजे आणि सुरक्षित वाहतुकीसाठी वाहतूक नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे, असे प्रतिपादन पुणे परिमंडळ-५ चे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी केले.ते एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठात पोलीस वर्धापन दिन आणि रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित व्यसनमुक्ती व वाहतूक जनजागृती कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. या



कार्यक्रमाचे आयोजन एमआयटी एडीटी विद्यापीठ, हडपसर वाहतूक विभाग आणि लोणी काळभोर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

याप्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनिता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., हडपसर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट, लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण सहाय्यक संचालक डॉ. प्रतिभा जगताप, अधिष्ठाता डॉ. गणेश पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. यांनी विद्यार्थ्यांना जीवनात '३६०-डिग्री' दृष्टिकोनाचा अवलंब करण्याची गरज प्रतिपादित केली. सर्वसमावेशक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी स्वयंशिस्त ही पहिली गरज असून, स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मसात करण्याचे आणि व्यसनमुक्तीसाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर 'विश्वशांती प्रार्थने'ने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांनी आपल्या प्रास्ताविकात स्वयंशिस्तीचे महत्त्व विशद केले.पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी वाहतूक नियमांच्या पालनावर भर दिला आणि विद्यापीठाच्या शिस्तीचे कौतुक करताना ही शिस्त आध्यात्मिक पायावर निर्माण झाल्याचे नमूद केले. वाहतूक पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट यांनी वाहतूक सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. प्रतिभा जगताप यांनी आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



**बारामती :** मराठी पत्रकार दिनानिमित्त दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस उपविभागीय अधिकारी कार्यालयातील नायब तहसिलदार प्रतिभा शिंदे यांनी उप माहिती कार्यालय, नवीन प्रशासकीय भवन येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमास निवासी नायब तहसीलदार नामदेव काळे, नायब तहसीलदार स्वाती गायकवाड, पुरवठा निरीक्षण अधिकारी तितिक्षा बारापात्रे, उप माहिती कार्यालयातील कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते.यावेळी नायब तहसिलदार प्रतिभा शिंदे यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.

## पुण्यातील वॉर्ड क्रमांक ९ मध्ये चुरशीची लढाई, विरोधक रणनीती आखण्यात गुंतले

**पुणे :** पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ जशी जवळ येत आहे, तसतसा प्रभाग क्रमांक ९ मधील राजकीय वातावरण चांगलाच तापू लागले आहे.या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत नगरसेवक उमेदवार सौ. रोहिणी सुधीर चिमटे, श्री. गणेश जानोबा कळमकर, सौ. मयुरी राहुल कोकाटे व श्री. लहू गजानन बालवडकर यांनी आज जोरदार शक्तिप्रदर्शन करत प्रचाराचा दमदार शुभारंभ केला. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, बाणेर येथून निघालेल्या भव्य पदयात्रेने संपूर्ण प्रभागाचे लक्ष वेधून घेतले. पक्षाचे झेंडे, घोषणांचा गजर, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि नागरिकांची गर्दी यामुळे संपूर्ण परिसरात निवडणुकीचा जल्लोष पाहायला मिळाला.

हनुमान मंदिर, राम मंदिर, भैरवनाथ मंदिर, पुणे महानगरपालिका कचरा शाळा, श्री सावतामाळा मंदिर, बालेवाडी फाटा, श्री गणेश मंदिर ते शिवम बालवडकर संपर्क कार्यालय असा हा प्रचार मार्ग होता.

पदयात्रा जिथे जिथे पोहोचली, तिथे तिथे नागरिकांनी फुलांची उधळण, टाळ्यांचा कडकडाट आणि उत्स्फूर्त घोषणांनी उमेदवारांचे स्वागत केले.

यावेळी लहू बालवडकर यांनी सांगितले हा प्रचार नाही, हा विकासाचा संकल्प आहे. प्रभाग ९ मध्ये स्वच्छता, पायाभूत सुविधा, पाणी, रस्ते, सुरक्षा आणि सुशासन यासाठी आम्ही ठोस कृती आराखड्यासह मैदानात उतरलो आहोत. आजचा जनसमुदाय आणि नागरिकांचा विश्वास पाहता विजय आमचाच आहे.

या प्रचार यात्रेत भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास आणि संघटनेची ताकद पाहता भाजपाने या प्रभागात निवडणुकीच्या रणधुमाळीत आघाडी घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. फक्त घोषणा नाहीत, कामाचा अनुभव दिसतो. उमेदवार रस्त्यावर उतरून आमच्याशी बोलत आहेत, हीच खरी लोकशाही आहे. यावेळी आम्ही विकासालाच मत देणार, अशी प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकांनी दिली. दरम्यान, एकीकडे विरोधक अजून रणनीती आखण्यात गुंतलेले असताना, भाजपाने मात्र थेट जनतेत उतरून प्रचाराची आघाडी घेतली आहे.

## शेतकऱ्यांच्या गोठ्यातील पशुधन चोरीचा पर्दाफाश; वडगाव निंबाळकर पोलिसांची धडक कारवाई

**बारामती :** शेतकऱ्यांच्या गोठ्यातील पशुधनाची चोरी करणाऱ्या तिघांना वडगाव निंबाळकर पोलिसांनी शिताफीने अटक केली. या चोरट्यांचा छडा लागल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले. अजय ऊर्फ गोविंद सतीश होळकर (रा. होळ, ता. बारामती), आर्यन सचिन माने (रा. निरगुडवाडी, सदोबाचीवाडी, ता. बारामती) व शिवभान ऊर्फ बंटी नंदकुमार घोडके (रा. वडगाव निंबाळकर, ता. बारामती) अशी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची नावे



आहेत. वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सदोबाचीवाडी गावातील इनामवस्ती (होळ रस्ता) येथील संजय जगन्नाथ होळकर यांच्या घराशेजारील जनावरांच्या गोठ्याची लोखंडी जाळी तोडून चोरट्यांनी एक शेळी व चार बोकडांची चोरी केली होती. याप्रकरणी होळकर यांनी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती.वडगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेत लागलीच तपासाला सुरुवात केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी शेळ्या, बोकड चोरल्याची कबुली दिली.या तिघांनाही अटक करत बारामती न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्याकडून चोरलेली पाच बोकडे पोलिसांनी परत मिळविली. गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकींसह १ लाख १५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. पुढील तपास हवालदार पोपट नाळे हे करत आहेत.ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, अप्पर अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली वडगावचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नागनाथ पाटील, हवालदार पोपट नाळे, सागर चौधरी, हृदयनाथ देवकर, महेश पन्हाळे, भाऊसाहेब मारकड, आबा जाधव, सूरज धोत्रे, विलास ओमासे आदींनी केली.

## शिवसेनेत युवा चेहऱ्यांना संधी : उदय सामंत





**पुणे :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी कोणत्या उमेदवारांना संधी दिली आहे हा चर्चेचा विषय ठरत आहे. काही पक्षांकडून वादग्रस्त व गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना संधी दिली गेली आहे. तर इतर पक्षांचे उमेदवार एकमेकांच्या कार्यकर्त्यांसह वाद करत आहेत, अशी माहिती उदय सामंत यांनी बोलताना दिली. ते पुढे म्हणाले की, शिवसेना कायमच युवा चेहऱ्यांना संधी देत असते. या उलट एकीकडे 'जिंकण्याच्या गणितासाठी' वादग्रस्त उमेदवारांना संधी देण्याची भूमिका इतर पक्षांनी घेतली आहे.

अनेक पक्षांमध्ये आधी इतर पक्षातील उमेदवार किंवा कार्यकर्ते यांना प्रवेश देण्यावरून वादावादी होती. आता निवडणूक प्रचारा दरम्यान त्यांच्या एकाच प्रभागातील उमेदवार जून मुद्दे उकरून काढत शहरात वाद करत असल्याचे चित्र दिसत आहे. शिवसेनेकडून (शिंदे गट) पुण्यात नव्या आणि तरुण चेहऱ्यांना संधी देण्यावर भर दिला जात आहे. सामाजिक कार्य, विद्यार्थी चळवळ आणि स्थानिक प्रश्नांशी थेट जोडलेले युवा कार्यकर्ते पुढे आणण्याची रणनीती शिवसेनेने अवलंबल्याचे दिसून येत आहे.

पुण्यातील लढाई ही विकासाची आणि विशासघाताची असल्याचे सांगत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुणे शहर ही कोणा एका पक्षाची मक्तेदारी नाही. पुणेकरांना विकास हवा आहे आणि एकनाथ शिंदे यांनी केलेले काम घराघरांत पोहोचवा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

दरम्यान, उदय सामंत यांनी म्हटलं की, ज्याप्रमाणे २००४ मध्ये मी तरुण म्हणून निवडणूक लढलो, तशीच संधी यावेळी अनेक नव्या चेहऱ्यांना दिली आहे. शिवसेना-भाजप युती नैसर्गिक असली तरी आम्हाला कमी लेखणाऱ्यांना निवडणुकीच्या निकालातून उत्तर देऊ. ज्या ज्या भागात गेलो तिथे लोकांनी शिवसेनेला आशीर्वाद देणार असल्याचं सांगितलं आहे, असंही सामंत यांनी यावेळी नमूद केलं.

## अजित पवार मैदानात, पण सुप्रिया सुळे प्रचारातून गायब; पुण्यात राजकीय चर्चांना उधाण

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीत भाजपसह सर्व पक्षांमध्ये उमेदवारीसाठी इच्छुक होते; पण भाजपने ऐनवेळी ४० माजी नगरसेवकांचे पत्ते कट केले. उद्धवसेनेच्या माजी नगरसेवकांनी भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार) आणि शिंदेसेनेत प्रवेश केले. त्यामुळे या निवडणुकीत आयाराम गयारामची चलती झाली आहे. त्यामुळे सर्वच पक्षातील निष्ठावंतांसह कार्यकर्ते नाराज झाले. ही नाराजी विविध आश्र्वासने देऊनही दूर करता आलेली नाही. त्यामुळे नाराज कार्यकर्ते प्रचारात उतरले नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे येत्या आठ दिवसात तरी या नाराजीचे ग्रहण सुटणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजपने अनेक नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. त्यासाठी २०१७ च्या निवडणुकीत निवडून आलेल्या ४० नगरसेवकांचा पत्ता कट केला आहे. त्यामुळे हे माजी नगरसेवक आणि त्याचे कार्यकर्ते नाराज झाले आहेत. उमेदवारीसाठी पात्र असताना डावलले गेल्याने नाराजांना पक्षाचे आमदार आणि नेते भेटत असले तरी हे नाराज प्रचारात उतरण्यास तयार नाहीत.

पालिका निवडणुकीचा जाहीर प्रचार संपण्यासाठी केवळ आठ दिवसांचा कालावधी राहिला आहे. तरीही नाराज कार्यकर्ते प्रचारात दिसत नाहीत. काही नाराज केवळ प्रचाराच्या वेळी तोंड दाखविण्यासाठी समोर येत आहेत. ही नाराजी कायम असल्याने त्याच्याकडून उमेदवारांना सहकार्य होत नाही. त्यामुळे पक्षातील दुताच्या माध्यमातून नाराज लोकांशी संपर्क साधला जात आहे; पण तरीही नाराज कार्यकर्ते प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे प्रचार करताना काही ठिकाणी उमेदवारांचा जीव मेटाकुटीला आला आहे. आश्वासनाची खैरात होऊनही नाराजी कायममहापालिका निवडणुकीसाठी सर्वच पक्षात उमेदवारी मिळविण्यासाठी चुरस होती.

# 'बजाज पुणे ग्रँड टूर'मार्गावर स्वच्छता मोहिम राबवावी : जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी



**पुणे :** 'बजाज पुणे ग्रँड टूर– २०२६'या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा मार्ग तसेच गावाचेही दूर चित्रवाहिनीद्वारे जागतिक पातळीवर थेट प्रक्षेपण होणार असून आपल्या गावाची दृश्य देश विदेशात पोहचणार आहे, याद्वारे पर्यटनाला चालना तसेच स्थानिकांना रोजगार आणि पर्यायाने गावाचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे, त्यामुळे प्रशासनाने मार्गावर संपूर्ण स्वच्छता राहील, यादृष्टीने स्थानिकांना विश्वासात घेवून सुक्ष्म नियोजन करावे, प्रशासनासोबत स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक, गृहनिर्माण सोसायटी व गणेश मंडळाचे पदाधिकारी, महाविद्यालये, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आदी घटकांनी मिळून मोहिमस्तरावर स्वच्छता मोहिम राबवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

जिल्हाधिकाऱ्यांनी आज 'बजाज पुणे ग्रँड टूर– २०२६' च्या टप्पा–२ च्या अनुषंगाने संपूर्ण स्पर्धा मार्गावरील असलेल्या गावनिहाय पाहणी करुन नागरिकांशी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार शंकर मांडेकर, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, हवेलीचे प्रांताधिकारी यशवंत माने, पुरंदरच्या वर्षा लांडगे, भोर वेल्हाचे विकास खरात, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बाविस्कर, कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, पुणे शहरचे तहसीलदार अर्चना निकम, पुरंदरचे विक्रम राजपुत, वेल्हा श्रीनिवास ढाणे, 'बजाज पुणे ग्रँड टूर'चे तांत्रिक सल्लागार पिनाकी बायसक आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी आज पुरंदर तालुक्यातील श्री दत्तमंदीर सभागृह नारायणपूर, भोर तालुक्यातील अविनाश मल्टिपर्पज हॉल, कापूरव्होळ, भोर तालुक्यातील शिवालय गार्डन मंगल कार्यालय, खेडशिवापूर, श्री दत्तमंदीर करंजावणे, हवेली तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय, डोणजे येथे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, मंडल अधिकारी, तलाठी, ग्राम विकास अधिकारी, पोलीस पाटील, शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, मुख्याध्यापक आदींची बैठक घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी श्री. डूडी यावेळी म्हणाले, आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धेचे महत्व लक्षात घेता प्रशासनाच्यावतीने गुणवत्तापूर्ण व दर्जेदार रस्ते तयार करण्यात आले आहेत. स्पर्धेच्या माध्यमातून आपल्या गाव व परिसरातील नैसर्गिक सौंदर्य, पर्यटनस्थळे, शिवकालीन इतिहास जगभर पोहोचविण्याची संधी आहे. या टप्पाअंतर्गत येणाऱ्या गावात खेळाडू आल्यास स्वयंशिस्त पाळत महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती, संगीत, वेशभुषा, नाटक, पथनाट्य, लोकनाट्य आदी माध्यमाद्वारे स्वागत करावे, स्पर्धेवेळी येथील ग्रामस्थानी, नागरिकांनी स्पर्धेच्या मार्गावर बाजूला उभे राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा. असे करतांना स्पर्धेला अडथळा निर्माण होणार नाही, मार्गावर पाळीव प्राणी येऊ देऊ नयेत, याबाबत सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

ही स्पर्धा फक्त महाराष्ट्राची नव्हे तर देशाची सर्वात मोठी स्पर्धा असणार आहे. स्पर्धेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याचा इतिहास पुढे येणार आहे असून एक नवीन इतिहास जगासमोर आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. सर्वांनी एकत्रित होऊन मोठे काम होऊ शकते हे दाखवून देऊ, असा विश्र्वास व्यक्त करत प्रशासनासोबत स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. डुडी यांनी केले.

आमदार श्री. मांडेकर म्हणाले, 'बजाज पुणे ग्रँड टूर'ही आंतराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा जिल्ह्यात होत असून याद्वारे पर्यटनास चालना मिळणार आहे, त्यादृष्टीने प्रशासन अहारोत्र काम करीत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रारंभी लेडीज कल्ब येथून पाहणी दौऱ्यास सुरुवात करत नांदेड सिटी येथे समारोप केला. यावेळी गावनिहाय जिल्हाधिकारी, आमदार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सायकल स्पर्धेच्या अनुषंगाने काढलेल्या चित्रांनी स्वागत केले, यामाध्यमातून स्पर्धेबाबत त्याच्या मनात कमालीची उत्सकूता दिसून येत होती.

**असा असेल स्पर्धेचा टप्पा–२**

लेडीज कल्ब, कॅम्प येथून प्रारंभ होऊन गोळीबार चौक, कोंढवा, येवलेवाडी, भिवरी, चांबळी, कोडीत, नारायणपूर, चिव्हेवाडी, केतकावळे, कापूरव्होळ, कासुर्डी, मोहरी, जांबळी, आंबवणे, करंजावणे, वांगणी, निघडे, कुसगाव, खेड शिवापूर, कोंढणपूर, सिंहगड घाट रोड, डोणजे, किरकिटवाडी, खडकवासला आणि नांदेड सिटी सिंहगड रोड येथे स्पर्धेचा शेवट होणार आहे.

## दिव्यांग क्षेत्रात कार्यरत संस्थांनी ३१ जानेवारीपर्यंत नोंदणी करावी

**मुंबई :** मुंबई उपनगर जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात अनेक संस्था विना नोंदणी कार्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण व कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अशा संस्थांची कायद्यानुसार नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर रविकिरण पाटील यांनी केले आहे.

दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली ७ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत दिव्यांग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांची नोंदणी अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कल्याण आयुक्तांना सक्षम अधिकारी घोषित करण्यात आले असून, त्यांच्यामार्फत संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ नुसार संस्थेची नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार मुंबई उपनगर जिल्ह्यातील ज्या संस्थांना दिव्यांग क्षेत्रात कार्य करायचे आहे, त्यांनी संस्थेच्या नोंदणीचा प्रस्ताव संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयाकडे सादर करावा.

नोंदणी न करता कार्यरत असलेल्या संस्थांवर दिव्यांग हक्क अधिनियमनुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## उमेदवारांना पैसे वाटताना मला कोणी भेटलं तर तिथेच बदडून काढणार; खैरेंचा इशारा, बावनकुळेंवरही टीका

**बीड :** मराठवाड्यातील सर्वात मोठी महापालिका आणि दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं विशेष प्रेम असलेलं शहर म्हणून छत्रपती संभाजीनगरकडे पाहिलं जातं. सध्याच्या महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत संभाजीनगर महापालिकेच्या निवडणुकीकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. कारण, यंदा प्रथमच येथील निवडणुकी शिवसेना विरुद्ध शिवसेना असा थेट सामना होत आहे. त्यामुळे, आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी ठाकरेंच्या शिवसेनेला संघर्ष करावा लागणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावरुन शिवसेना शिंदे गट आणि भाजपकडून शिवसेना ठाकरे गटावर हल्लाबोल केला आहे. तर, भाजप आणि शिंदे गट पैसा आणि सत्तेच्या जोरावर ही निवडणूक लढवत असल्याचा आरोप शिंदे गटाचे नेते करत आहेत. माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी बीड दौऱ्यावर असतानाही मंत्री संजय शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

छत्रपती संभाजी नगर महापालिकेत सत्ताधाऱ्यांकडून उमेदवारांना मॅनेज करून पैसे वाटप केले जात आहेत. पैसे वाटताना मला कोणी भेटले तर तिथेच त्याला बदडून काढणार असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी दिला. आत्तापासूनच पैसे घेऊन मत विकत घेतली जात आहेत, असा गंभीर आरोपही चंद्रकात खैरे यांनी केला आहे. त्यामुळे, महापालिका निवडणुकीत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावरुन होणाऱ्या टीकेलालाही खैरेंनी प्रत्युत्तर देत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही कडक शब्दात टीका केलीय.

**बावनकुळे हे इलेक्ट्रिक कंत्राटदार होते**

आम्ही हिंदुत्वविरोधी असतो तर रुद्राक्षाच्या माळा, गंध लावले नसते. हिंदुत्व तुम्ही संपवले असं म्हणत खैरे यांनी पालकमंत्री संजय शिरसाट यांना प्रतिउत्तर दिले. तर चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर टीका करत बावनकुळे इलेक्ट्रिक कंत्राटदार होते. गडकरींनी त्यांना आणले आणि आता ते देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत आहेत. बावनकुळे नेते बदलू माणूस, त्याला काहीही माहित नाही असा एकेरी उल्लेख करत खैरेंनी बावनकुळे यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. खोटं बोल पण रेटून बोल असं त्यांचं सध्या चालू आहे. छत्रपती संभाजी नगर शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना आवडायचे. त्यामुळे, या निवडणुकीत जिंकून, महापालिकेत आम्ही आमचं अस्तित्व टिकवणार असल्याचा विश्वास खैरेंनी यावेळी बोलून दाखवला.

## पुणे शहराला सर्वोत्तम करण्यासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ



**पुणे :** प्रतिनिधीभारतीय जनता पक्ष हा विचाराने आणि लोकांसाठी काम करणारा पक्ष आहे. निवडणूक असो वा नसो बारा महीने २४ तास काम करणारा भाजपचा कार्यकर्ता असतो. पुण्यातराष्ट्रवादी काँग्रेसची अवस्था बिकट आहे. त्यांना निवडणुकीसाठी उमेदवार सुद्धा सापडत नाही. त्यांनी उमेदवार आयात केले आहेत. पुणे शहराला देशातील सर्वोत्तम शहर करायचे असेल तर मोदींशिवाय पर्याय नाही. आम्हाला केवळ सत्ता नको आहे तर जनतेची सेवा करायची आहे, असे मतकेंद्रीय सहकार राज्यमंत्री, पुणे शहराचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले.

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी औंध–बोपोडी प्रभाग क्रमांक ८ मधून भारतीय जनता पक्ष व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (RPI) च्या वतीने सनी विनायक निम्हण, परशुराम वाडेकर, भक्ती अजित गायकवाड, सपना आनंद छाजेड हे चार उमेदवार उभे आहेत. त्यांच्या प्रचाराचा शुभारंभ आज बोपोडीचे ग्रामदैवत भैरवनाथा चे दर्शन घेऊन करण्यात आला. यावेळी मुरलीधर मोहोळ बोलत होते.

यावेळी शिवाजीनगा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांसह भाजप व आरपीआयचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.मुरलीधर मोहोळ म्हणाले, मागील पाच वर्षात आम्ही पुणे महापालिकेत जे काम केले; त्यामाध्यमातून पुणे शहराला विकासाच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मागील सहा वर्षातील आमदार म्हणून सिद्धार्थ शिरोळे यांचे काम, देशातील मोदी सरकारचे काम आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांचे राज्य सरकारचे काम पाहिले तर घरोघरी सरकारी योजनेचा लाभार्थी सापडतो. आम्हाला केवळ सत्ता नको आहे तर जनतेची सेवा करायची आहे.

यावेळी सनी निम्हण म्हणाले, स्वर्गीय मा .मंत्री चंद्रकात छाजेड साहेबांचा सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा विचार आणि स्वर्गीय कार्यसम्राट आमदार विनायक निम्हण साहेबांची काम करण्याची धमक घेऊन आम्ही चारही उमेदवार या प्रभागाचा समतोल आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहू.अन्न,वस्त्र,निवारा या बरोबरच शिक्षण आणि आरोग्य सुविधा या मूलभूत गरजा आहेत. यामुळे बोपोडी परिसरात उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देऊ, या भागात महापालिकेचे दोन दवाखाने आहेत त्यांना दर्जेदार करण्याबरोबरच ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्यात येईल तसेच दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी इ लॉर्निंग स्कूल सुरू करू असा शब्द त्यांनी दिला. तसेच सर्व जाती– धर्मांना सोबत घेऊन विकास करण्यासाठी आम्ही जनते समोर जात आहोत असेही नमूद केले.


### जाहीर पेपर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, पती **कै. सुनील बाळासाहेब गवळी** यांचे दिनांक २२ मार्च२०२१ रोजी निधन झाले असून त्यांचे नावे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे **वाहन क्र.MH-12 JM4690,** नावाने नोंद आहे.

तरी त्यांचे पश्चात कायदेशीर वारसदार म्हणून मी त्यांची **पत्नी रेणुका सुनील गवळी** माझे नावे करण्याकरता अर्ज दिला असून सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे. सबब या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, ज्या कोणाची तक्रार अथवा हरकत असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रा.प. कार्यालय, पुणे येथे पंधरा दिवसांचे आत समक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाहन माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार गाह्य धरली जाणार नाही. कळावे.

पुणे

**अर्जदार नाव पत्नी : रेणुका सुनील गवळी**

**पत्ता :** श्री. रेशी फ्लॅट नं.१ काशीद कॉलनी एनआर जवळकर नगर पिंपळे गुरव पुणे –४११०६१

**दिनांक :** ०७/०१/ २०२६



### जाहीर पेपर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, पती **कै. सतीश रमनीकलाल शाह** यांचे दिनांक ७ नोव्हेंबर २०२५ रोजी निधन झाले असून त्यांचे नावे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे **वाहन क्र.MH-01 DX4876,** नावाने नोंद आहे.

तरी त्यांचे पश्चात कायदेशीर वारसदार म्हणून मी त्यांची **पत्नी ज्योत्सना सतीश शाह** माझे नावे करण्याकरता अर्ज दिला असून सोबत कोणाची तक्रार नसल्याचे हमीपत्र दिले आहे. सबब या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, ज्या कोणाची तक्रार अथवा हरकत असल्यास त्या संबंधीत व्यक्तीने प्रा.प. कार्यालय, पुणे येथे पंधरा दिवसांचे आत समक्ष अथवा लेखी कळवावे. अन्यथा ह्याबाबत कोणाचीही हरकत नाही असे समजून वरील वाहन माझे नावे हस्तांतरीत करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही तक्रार गाह्य धरली जाणार नाही. कळावे.

पुणे

**अर्जदार नाव पत्नी : ज्योत्सना सतीश शाह**

**पत्ता :** ८०१ प्लुटॉन,झिरकॉन व्हेंचर सीएचएस, विमाननगर पुणे – ४११०१४

**दिनांक :** ०७/०१/ २०२६